**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग

संचालनालय, लेखा व कोषागारे

तळ मजला, कस्तुरी इमारत, पेट्रोलियम हाऊस समोर, जमशेदजी टाटा मार्ग,

चर्चगेट, मुंबई-४०००२०

दूरध्वनी क्र: ०२२- २२६२२०२९ ई-मेल : ad.admin@mahakosh.in संकेतस्थळ : www.mahakosh.gov.in


---

वाचा :-
१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८.०६.१९९५
२. शासन निर्णय वित्त विभाग क्र.११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३,दि.२०.०७.२००१
३. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३,दि.११.०१.२००२
४. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४३/सेवा-३,दि.३१.०८.२००९
५. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/९९/सेवा-३,दि.०१.०४.२०१०
६. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०१.०७.२०११
७. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१२/प्र.क्र.७१/सेवा-३,दि.१९.०१.२०१३
८. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०९.१२.२०१६
९. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३ दि.२३.१२.२०१५
१०. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.०८/सेवा-३ दि.११.०५.२०१७
११. शासन निर्णय,वित्त विभाग,क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दि.०२.०३.२०१९
१२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दि.०१.०८.२०१९
१३. वित्त विभागाचे पत्र क्र.वेतन-२०१९/प्र.क्र.१२५/सेवा-३, दि.१०.१२.२०१९.
१४. वित्त विभागाचे पत्र क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/सेवा-३, दि.०२.११.२०२०.
१५. संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/का-१/प्रशा-राप/२४, दि.११.०१.२०२१.
१६. वित्त विभाग आदेश क्र.विभाचौ २०१८/प्र.क्र.२०/कोषा.१, दि.१३.१२.२०२१

---

क्र.संलेको २०२४/प्रशा-राप/सुसेआप्रयो/ले.अ./ 1551 दिनांक :- 26 DEC 2024

## -: आदेश :-

**विषय :-** राज्य शासकीय कर्मचारी/अधिकारी यांना तीन लाभांच्या योजनेंतर्गत सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करणेबाबत.

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासकीय कर्मचारी / अधिकाऱ्यांना १०,२० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वित्त विभागाच्या दि.०२.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयामधील नमूद तरतुदीनुसार, सातव्या आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड पे रु.५४००/- या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी /अधिकाऱ्यांना लागु राहील. संबंधित कर्मचारी / अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस-२१ मध्ये वेतन आहरीत करु लागतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

तथापि महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक संवर्गातील जे अधिकारी सातव्या वेतन आयोगानुसार एस-२० या वेतन स्तरामध्ये वेतन आहरित करतात, त्यांचे पुढील पदोन्नती साखळीतील पद उपसंचालक असून ते एस-२३ या वेतनस्तरामध्ये येते. याबाबत शासन वित्त विभागाने दि.०२.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये "सहायक संचालक पदावरील अधिकाऱ्यास विद्यमान एस-२० या वेतनस्तरानंतर पदोन्नतीच्या साखळीत (In Promotional Hierarchy) एस-२३ या वेतनस्तरामध्ये उपसंचालक हे पद असल्याने, विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पात्रता आजमावल्यानंतर, पात्र ठरत अराल्यास, संबंधितास वेतनस्तर एस-२३ मध्ये अनुज्ञेय लाभ मंजूर करता येईल". अशी मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखा अधिकारी संवर्गातील श्रीम.वैशाली पाटील दि.३०.०६.१९९९ पासून सरळसेवेने लेखा अधिकारी संवर्गात कार्यरत आहेत. श्रीम.पाटील यांना लेखा अधिकारी संवर्गातील नियमित सेवेची १२ वर्षे दि.३०.०६.२०११ रोजी पूर्ण झाली. त्यानुसार तत्कालिन सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत श्रीम.पाटील यांना सहायक संचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय करण्यात आला आहे.

श्रीम.पाटील यांना वित्त विभाग, शासन निर्णय दि.०२.०३.२०१९ नुसार १२+८=२० वर्षांची नियमित सेवा दि.३०.०६.२०१९ रोजी पूर्ण झाली आहे.

तथापि श्रीम.वैशाली पाटील, लेखा अधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री सहायता निधीकरिता प्राप्त झालेले धनादेश कपाटामध्ये ठेऊन सबंधित खात्यामध्ये विहित कालावधीत जमा न केल्याने रु.३.४२ कोटीचे आणि त्यावरील व्याजाचे कायमस्वरूपी नुकसान झाल्याने त्यांच्याविरुद्ध शासन ज्ञापन दि.१९/०६/२०१८ अन्वये विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली. सदर विभागीय चौकशीअंती श्रीम.पाटील यांना शासनाचे दि.१३/१२/२०२१ रोजीच्या शिक्षादेशान्वये **"पुढील वेतनवाढ त्या पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता दोन वर्षांकरिता रोखण्यात यावी" अशी शिक्षा बजाविण्यात आली आहे. श्रीम.पाटील यांना बजाविण्यात आलेल्या शिक्षेचा अंमल दि.३०.०६.२०२४ रोजी संपुष्टात आला आहे.**

त्यानुसार श्रीम.पाटील यांना पहिल्या लाभाच्या दिनांकापासून तीन लाभांच्या योजनेंतर्गत १२+८=२० वर्षांच्या नियमित सेवेनंतर उपसंचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ हा शासकीय सेवेतील दुसरा लाभ म्हणून खालील तक्त्यात त्यांच्या नावासमोर स्तंभ -८ मध्ये नमुद केलेल्या दिनांकापासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | शासकीय सेवेतील नियुक्तीचा दिनांक | सु.प्र.आ.से. योजनेंतर्गत पहिला लाभ मिळाल्याचा दिनांक | म .से.व ले.वि. वर्ग १-परीक्षा उत्तीर्ण केल्याचा दिनांक | वर्षांची २० नियमित सेवा पूर्ण झाल्याचा दिनांक | शिक्षेचा अंमल संपुष्टात आल्याचा दिनांक | तीन लाभांच्या योजनेनुसार दुसरा लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | श्रीम.वैशाली अशोक पाटील | ३०-०६-१९९९ लेखा अधिकारी | ३०.०६.२०११ सहायक संचालक संवर्गाची वरिष्ठ वेतनश्रेणी | भाग-१ : नोव्हें., २००४ भाग-२ : नोव्हें., २००४ | ३०.०६.२०१९ | ३०.०६.२०२४ | ०१.०७.२०२४ उपसंचालक संवर्गाची वरिष्ठ वेतनश्रेणी |

अटी व शर्ती :

१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.०८.०६.१९९५ मधील अट क्र.२ (मा) : या योजनेंतर्गत अनुज्ञेय करण्यात आलेल्या लाभामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या जबाबदारी आणि कर्तव्यामध्ये वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेत वेतन निश्चितीचा लाभ मिळेल. या योजने अंतर्गत

वरिष्ठ वेतन संरचना दिल्यानंतर वेतन निश्चिती नियमित पदोन्नतीप्रमाणे होईल मात्र त्याच वेतन संरचनेत नियमित-कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.

२. शासन निर्णय वित्त विभाग दि.०२.०३.२०१९ मधील अट क्र.(xx) (३) : या योजनेंतर्गत पहिला, दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसूली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढुन घेतल्यानंतर संबंधिताची वेतननिश्चिती ही त्यांना जणु काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ मधील नियम १२ च्या तरतुदीनुसार करण्यात येईल.

३. या आदेशान्वये तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-१०८२/सीआर/११००/(एक)/एसईआर-३, दिनांक ०६.११.१९८४ व वित्त विभाग, शासन परिपत्रक वेपूर- २०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि.२०.०२.२०१९ नुसार वेतन निश्चितीचा विकल्प द्यावयाचा असल्यास तो त्यांनी हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावा.

४. **संबंधित कार्यालय प्रमुखांनी वरील अधिकाऱ्यांची पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेतील वेतन निश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करुन त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकानुसार देण्यांत यावा.**

५. **वित्त विभाग, शासन निर्णय दि.०२.०३.२०१९ मधील नमुद तरतुदींनुसार उपरोक्त अधिकाऱ्यांना अनुज्ञेय थकबाकीची रक्कम प्रदान करण्यात यावी.**

६. **सदरचे आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीसाठी कार्यालय प्रमुख यांनी संकेतस्थळावरील प्रत ग्राह्य धरावी.**

(दीपा देशपांडे)
संचालक,
लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :- १. सहसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ०३२
२. आदेशातील नमुद लेखा अधिकारी यांचे विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३. संबधित अधिकारी यांना त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत.
४. संबधित अधिकारी यांची वैयक्तिक नस्ती.
५. निवड नस्ती.